महावितरण — सुचना

"म.रा.वि.वि.कं.मर्या., पेण मंडळ, पनवेल ग्रा. विभाग येथे कार्यरत असलेले के. एम अल्लार स्वामी यांचे अवलंबित वारसदार श्री. शंकर गणेश अल्लार स्वामी यांना अनुकंपातत्वावर सहा.शिपाई या पदावर ३ वर्ष कंत्राटी पदधतीवर नियुक्ती देणेसाठी भांडुप परिमंडळ कार्यालयाकडुन पत्र क्र. मुअ/भांनाप/मासं/२०५३ दि. ११.११.२०२५ अन्वये भांडुप विभाग कार्यालयास वर्ग करण्यात आले आहे. आपणांस नियुक्ती देणे विचाराधीन असुन त्या संदर्भात आपणांस या आधी कार्यालयास भेट देणे संदर्भात वारंवार कळविण्यात आले होते, तसेच प्रत्यक्ष आपण दिलेल्या घराच्या पत्त्यावर (रुम नं १५ इंदिरा चाळ, मुरुगन स्टोअर जवळ, धारावी क्रॉस रोड, मुंबई - १७) जावुन संपर्क केला असता तो पत्ता देखील सापडलेला नाही. उर्वरित कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी श्री. शंकर अल्लार स्वामी यांस पत्र क्र. काअ/भांवि/मासं/२७९० दि. २१.११.२०२५ अन्वये वैद्यकिय चाचणी पुर्ण करण्यासाठी डॉ. जयराम यांच्याकडे पाठविण्यात आले होते, परंतु अद्याप त्यांनी आपली वैद्यकिय चाचणी पूर्ण केलेली नाही.

श्री. शंकर गणेश अल्लार स्वामी यांना पत्राद्वारे तसेच भ्रमणध्वणीद्वारे देखील संपर्क करुन वरीलप्रमाणे सुचना देण्यात आलेल्या असुन श्री. स्वामी हे भांडुप विभागाशी संपर्क साधत नाही किंवा प्रतिसाद देत नाहीत. या जाहिरातीद्वारे श्री. स्वामी यांस मानवतावादी दृष्टीकोनातुन नियुक्तीची प्रक्रिया पुर्ण करण्यासाठी व रुजु होणेसाठी एक संधी देण्यात येत आहे. वर्तमानपत्राद्वारे प्रसिदध झालेल्या जाहिरातीनंतर ३ दिवसाच्या आत आपण महावितरण भांडुप विभागाशी त्वरीत संपर्क करावा, अन्यथा आपणांस कंपनीत काम करण्यास स्वारस्य नाही, असे समजुन **श्री. शंकर गणेश अल्लार स्वामी** यांचा अनुकंपतत्वावरील ३ वर्षे कंत्राटी कालावधीसाठी **सहाय्यक शिपाई** म्हणुन नियुक्तीचा दावा ररद करण्यात येईल."

कार्यकारी अभियंता, भांडुप विभाग.

कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय म. वि. रा. शिंदे मार्ग, एल. बी. एस. रोड, भांडुप, मुंबई – ४०० ०७८. मोबाईल नं. ८८७९६२५००८ / ३५२७
Email: ee.bhandup.78@gmail.com/hrbhandupdivision@gmail.com,

जाहीर सूचना

सूचित करण्यात येते की **सौ. विमला ताराचंद पचार व श्री. सुभाषचंद हनुमान पचार** हे मे. हरी ओम मार्बल अँड सिरॅमिक्स या भागीदारी संस्थेचे भागीदार असल्याचे स्वतःचे प्रतिनिधित्व करीत असून, सदर संस्थेचे भागीदार म्हणून ते खालील परिशिष्टात नमूद केलेल्या मिळकतींचे भाडेपट्टेदार आणि/किंवा मालक असल्याचा दावा करीत आहेत.

आमचा अशील **मे. पार्कर कम्युनिकेशन्स प्रा. लि.** यांना सदर मे. हरी ओम मार्बल अँड सिरॅमिक्स यांच्या सदर मिळकतींमधील भाडेपट्ट्याचे आणि/किंवा मालकी हक्क, हक्कनामे व हितसंबंध संपादन करण्याची इच्छा आहे.

सदर मिळकती किंवा त्यांच्या कोणत्याही भागासंदर्भात भाडेपट्टा, परवाना, सुखभोगाधिकार, भाडेकरार, जप्ती, न्यायनिर्णय, गहाण, भार, धारणाधिकार, बोजा, शंका, भेट, वारसा, मृत्युपत्राद्वारे देणगी, वैधानिक कर व देणी, मागणी, कारवाई, अनुपालन किंवा अन्य कोणत्याही प्रकारचा अथवा स्वरूपाचा कोणताही दावा, हक्क, मालकी किंवा हितसंबंध असलेल्या सर्व व्यक्तींनी या सूचनेच्या प्रसिद्धीपासून १४ दिवसांच्या आत योग्य कागदोपत्री पुराव्यासह, खाली सही करणाऱ्यांना आमच्या पत्त्यावर, वर्मा चेंबर्स, तळमजला, कार्यालय क्र. ८-११, होमजी स्ट्रीट, फोर्ट, मुंबई ४००००१ येथे कळवावे. अन्यथा, असा दावा त्याग केलेला आणि/किंवा निकाली निघालेला मानला जाईल.

परिशिष्ट मिळकत

१) **सर्व तो** भाग व विभाग असलेली जमीन, जी मरोल को-ऑपरेटिव्ह इंडस्ट्रियल इस्टेट लिमिटेडच्या कंपार्टमेंट/प्लॉट क्र. १४१ वर असून, गाव मरोळ, तालुका अंधेरी, नोंदणी जिल्हा व उपजिल्हा मुंबई उपनगर येथील सी.टी.एस. क्र. ४४३/२६(पी) अंतर्गत असून, मोजमापीत क्षेत्र ३,३०० चौ. फूट म्हणजेच अंदाजे ३०६.५७ चौ. मीटर, त्यावरील कारखाना शेड/इमारत (तळमजला व पहिला मजला) **वासह**, तसेच मरोल को-ऑपरेटिव्ह इंडस्ट्रियल इस्टेट लिमिटेडच्या प्रत्येकी रु. १००/- दर्शनी मूल्याच्या पूर्ण अदा **केलेल्या ६५ (पासष्ट) समभागांसह**, जे शेअर सर्टिफिकेट क्र. १२८ (विशिष्ट क्रमांक ३१६१ ते ३१८५) व शेअर सर्टिफिकेट क्र. ५० (विशिष्ट क्रमांक ११०१६ ते ११०५५) मध्ये समाविष्ट असून, ज्याच्या सीमा पुढीलप्रमाणे आहेत :

उत्तर : कंपार्टमेंट क्र. १३८ व ३७
दक्षिण : कंपार्टमेंट क्र. १४२
पूर्व : कंपार्टमेंट क्र. ३७
पश्चिम : ३३ मीटर रुंदीचा अंतर्गत लेआउट रस्ता.

२) कार्यालय क्र. ४०६, मोजमापीत क्षेत्र २०.९२ चौ. मीटर म्हणजेच अंदाजे २२५ चौ. फूट, मरोल भवन, मरोल को-ऑपरेटिव्ह इंडस्ट्रियल इस्टेट लिमिटेड, एम. व्ही. रोड, जे. बी. नगर, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०००५९ येथे स्थित.

डब्ल्यू३ लीगल एलएलपी
अशोक धनुका
उच्च न्यायालय अधिवक्ता
दिनांक : २५ जुलै, २०२६

इप्का लॅबोरेटरीज लिमिटेड

ipca A dose of life

सीआयएन: एल२४२३९एमएच१९४९पीएलसी००७८३६
नोंदणीकृत कार्यालय : ४८, कांदिवली इंडस्ट्रियल इस्टेट, कांदिवली (प.), मुंबई - ४०० ०६७
दूरध्वनी: ०२२-६६४७४७४७, ई-मेल: investors@ipca.com, वेबसाइट: www.ipca.com

सूचना

याद्वारे सर्वसामान्य जनतेस सूचित करण्यात येते की, इप्का लॅबोरेटरीज लिमिटेडचे खालील शेअर प्रमाणपत्र, ज्यांचे नोंदणीकृत कार्यालय ४८, कांदिवली इंडस्ट्रियल इस्टेट, कांदिवली (प.), मुंबई - ४०००६७ येथे, आणि जे खालील भागधारकांच्या नावावर नोंदणीकृत आहे, ते त्यांच्याकडून हरवले आहे.

अनु. क्र.	फोलिओ क्र.	धारकाचे/ नावे	प्रमाणपत्र क्र.	विभिन्न क्रमांक		शेअर्सची संख्या (दर्शनी मूल्य रु. १/- प्रत्येक)
				पासून	पर्यंत	
१	सी०००२१	चंपकलाल संयुक्तपणे पोपट बाई यांच्यासह	१६०४	१०६३४५३	१०६५४५२	२०००

वरील नमूद केलेली शेअर प्रमाणपत्रे खरेदी करण्यापासून किंवा त्यांच्याशी कोणत्याही प्रकारचा व्यवहार करण्यापासून सर्वसामान्य जनतेस याद्वारे सावध करण्यात येत आहे.
सदर शेअर प्रमाणपत्रांबाबत कोणत्याही व्यक्तीचा काही दावा असल्यास, या सूचनेच्या प्रकाशनापासून १५ दिवसांच्या आत असा दावा कंपनीकडे किंवा तिचे निबंधक आणि शेअर हस्तांतरण एजंट **एमयूएफजी इनटाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, २४७ पार्क, सी-१०१, पहिला मजला, एल. बी. एस. मार्ग, विक्रोळी (प.), मुंबई-४०००८३, दूरध्वनी: +९१८१०८११६७६** यांच्याकडे दाखल करावा. त्यानंतर कोणताही दावा ग्राह्य धरला जाणार नाही आणि कंपनी डुप्लिकेट शेअर प्रमाणपत्रे जारी करण्याची कार्यवाही करेल.

इप्का लॅबोरेटरीज लिमिटेडकरिता
हरीश पी. कामत
कंपनी सचिव
एसीएस ६७९२
ठिकाण : मुंबई
दिनांक : जुलै २४, २०२६

जाहीर सूचना

ज्यांना वासंबंधी स्वारस्य असेल त्यांनी नोंद घ्यावी:

याद्वारे सर्वसामान्य जनतेस सूचित करण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या मिळकतीसंदर्भात **श्री. नरसिंह नामदेव पाटील व इतर** (यापुढे ''मालक'' असा उल्लेख) यांच्या हक्क, मालकी व हितसंबंधाची आम्ही चौकशी करीत आहोत.

सदर परिशिष्टातील मिळकतीवर किंवा तिच्या कोणत्याही भागावर करार, मागणी, वारसा, विक्री, हस्तांतरण, अदलाबदल, गहाण, अभिहस्तांकन, भेट, विश्वस्त हक्क, ताबा, सुखाधिकार, भाडेदारी, भाडेपट्टा, प्रभार, धारणाधिकार, पोटभाडेदारी, देखभाल, मृत्युपत्र, इच्छापत्राद्वारे संपत्तीदान, विभाजन, दावा, न्यायप्रविष्ट वाद, न्यायालयीन हुकूम, जप्ती, मनाई आदेश, संपादन, अधिग्रहण, भार, विकास हक्क, संयुक्त उपक्रम, व्यवस्था, भागीदारी, कर्ज, आगाऊ रक्कम, एफएसआय/टीडीआर वापर अथवा कायद्याच्या अंमलबजावणीमुळे किंवा अन्य कोणत्याही प्रकारे सदर मिळकतीवर किंवा तिच्या कोणत्याही भागावर अथवा मालकास सदर मिळकत किंवा तिच्या कोणत्याही भागाचा विकास करण्याचा कोणताही हक्क, मालकी, इस्टेट, समभाग किंवा हितसंबंध असलेल्या कोणत्याही व्यक्तीने/व्यक्तींनी त्यासंबंधीची सूचना, समर्थनार्थ कागदपत्रांच्या प्रमाणित सत्य प्रतींसह, अधोहस्ताक्षरी यांना त्यांच्या कार्यालयात:- ६०३, बी विंग, ओम रेसिडेन्सी, भोईवाडा न्यायालयाजवळ, भोईवाडा, परळ, मुंबई-४०००१२ येथे, या सूचनेच्या प्रसिद्धीपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत लेखी स्वरूपात कळवावी. अन्यथा, असे सर्व दावे, हक्क किंवा हितसंबंध, असल्यास, त्याग केलेले आणि/किंवा सोडून दिलेले मानले जातील व ते सर्व हेतू व उद्देशांसाठी तसेच मालक, त्यांचे उत्तराधिकारी व हस्तांतरित व्यक्तींवर बंधनकारक राहणार नाहीत.

वर नमूद केलेल्या मिळकतीचे परिशिष्ट:

सर्व ती जमीन, जमिनीवरील वारसाहक्काची मालमत्ता व मिळकत, सर्व्हे क्र. ५५, हिस्सा क्र. ८, गाव राई, तालुका ठाणे, जिल्हा ठाणे, महानगरपालिका ठाणे यांच्या हद्दीत स्थित, ५७.२० गुंठे महसुली क्षेत्र मोजमापास अनुरूप असलेली.

स्थळ : मुंबई
दिनांक: २५.०७.२०२६
(श्वेता एस. शिर्के)
वकिल, उच्च न्यायालय

MCX — METAL & ENERGY — Trade with Trust

मल्टी कमोडिटी एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेड

सीआयएन : एल५१९०९एमएच२००२पीएलसी१३५५९४
नों. कार्यालय : एक्सचेंज स्क्वेअर, सुरेन रोड, चकाला, अंधेरी (पूर्व), मुंबई-४०० ०९३.
दूर.: +९१-२२-६७३१ ८८८८, ई-मेल आयडी : ig-mcx@mcxindia.com, वेबसाईट : www.mcxindia.com

भागधारकांना सूचना

विषय : इन्व्हेस्टर एज्युकेशन अँण्ड प्रोटेक्शन फंड (आयईपीएफ) ऑथॉरिटीकडे कंपनीच्या समभागांचे हस्तांतरण

कंपनीच्या भागधारकांना याद्वारे सूचना देण्यांत येते की, कंपनी अधिनियम, २०१३ (''अधिनियम'') च्या कलम १२४ आणि वेळोवेळी सुधारित इन्व्हेस्टर एज्युकेशन अँड प्रोटेक्शन फंड ऑथॉरिटी (अकाऊंटींग, ऑडिट, ट्रान्स्फर अँड रिफंड) रुल्स, २०१६ (''रुल्स'') च्या तरतुदीनुसार जर लाभांशाचे प्रदान आणि शेअर्सच्या कोणत्याही हस्तांतरणास मज्जाव करणारा न्यायालय किंवा न्यायाधिकरण किंवा वैधानिक प्राधिकरणाचा विनिर्दीष्टीत आदेश नसेल किंवा जर शेअर्सना डिपॉझिटरीज ॲक्ट, १९९६ च्या तरतुदींन्वये तारण किंवा जंगम गहाण ठेवले नसेल तर सलग सात (७) किंवा जास्त वर्षे कालावधीसाठी ज्यांच्या संबंधातील लाभांशावर भागधारकांनी दावा केला नाही किंवा तो प्रदान केलेला नाही ते सर्व शेअर्स सदर रुल्स अंतर्गत स्थापित इन्व्हेस्टर एज्युकेशन अँड प्रोटेक्शन फंड ('आयईपीएफ') कडे हस्तांतरित करण्याच्या तरतुदी आहेत.

भागधारकांना याद्वारे कळविण्यात येते की, आर्थिक वर्ष २०१८-१९ साठी कंपनीकडून घोषित झालेल्या अंतिम लाभांश जो सात वर्षे कालावधीसाठी दावा न होता पडून आहे तो निर्धारित वेळापत्रकानुसार आयईपीएफ कडे जमा केला जाईल. सलग सात वर्षांसाठी ज्यांच्या वरील लाभांश दावा न करता पडून होता ते संलग्न शेअर्स देखील रुल्स मध्ये मांडलेल्या प्रक्रियेनुसार आयईपीएफ कडे हस्तांतरित केले जातील.

उपरोक्त नियमांमधील आवश्यकतांचे पालन करत, कंपनीने आर्थिकवर्ष २०१८-१९ पासून सुरु होण्याऱ्या मागील सात सलग वर्षांपासून त्यांना देय असलेल्या लाभांश रकमेवर (अंतिम लाभांश) दावा न केलेल्या अशा भागधारकांमुळे आयईपीएफकडे हस्तांतरित होण्यास ज्यांचे शेअर्स पात्र ठरले आहेत त्या संबंधित भागधारकांना वैयक्तिकरित्या आयईपीएफ कडे ते हस्तांतरित होण्यापूर्वी आर्थिक वर्ष २०१८-१९ व त्यानंतरच्या आर्थिक वर्षासाठी घोषित झालेल्या अंतिम लाभांशावर दावा करण्यासाठी योग्य कार्यवाही करण्याचा सल्ला त्यांना देणारे पत्र जारी केले आहे.

भागधारकांनी ध्यानांत ठेवावे की, अशा शेअर्सवर उद्भूत झालेल्या सर्व लाभांसह आयईपीएफ ऑथॉरिटीकडे हस्तांतरित झालेले दावा न केलेले लाभांश आणि शेअर्स दोन्हीही रुल्स मधील निर्धारित प्रक्रिया अनुसरून आयईपीएफ ऑथॉरिटी कडून परत मागता येतील.

भागधारकांनी ध्यानांत ठेवावे की, आवश्यक तपशील म्हणजेच, नाव डीपी आयडी, क्लायंट आयडी, रक्कम आणि आयईपीएफकडे हस्तांतरित होण्यास पात्र ठरलेले शेअर्स आणि त्याप्रमाणे कंपनीकडून त्या लाभांशावर दावा करण्याकरिता संबंधित माहिती देणारे पत्र कंपनीच्या वेबसाईटवर https://www.mcxindia.com/investor-relations/shareholder-information येथे अपलोड केले आहे.

जर कंपनीला आर्थिक वर्ष २०१८-१९ साठी घोषित झालेल्या अंतिम लाभांशावर आणि त्यानंतर घोषित झालेल्या लाभांशावर दावा करण्यासासाठी २५ ऑक्टोबर, २०२६ पर्यंत संबंधित भागधारकांकडून लेखी स्वरुपांत कोणतेही पत्र (रितसर स्वाक्षरी केलेल्या दस्तावेजांची स्कॅन्ड किंवा हार्ड प्रत) प्राप्त झाले नाही तर रुल्स च्या आवश्यकतांचे पालन करण्याच्या दृष्टिने कंपनी रुल्स मधील निर्धारित प्रक्रियेनुसार नियत तारखेपर्यंत आयईपीएफ कडे संलग्न शेअर्स सहीत लाभांश हस्तांतरित करेल. कृपया ध्यानांत ठेवावे की, आयईपीएफ ऑथॉरिटीकडे हस्तांतरित केलेले शेअर्स आणि दावा न केलेल्या लाभांशाच्या संबंधात कंपनी विरुद्ध कोणताही दावा करता येणार नाही.

डिमॅट स्वरूपात शेअर्स धारण करणाऱ्या सभासदांनी त्यांच्या संबंधित डिपॉझिटरी पार्टीसिपंटशी संपर्क साधून त्यांचे ई-मेल आयडी, बँक तपशील आणि केवायसी नोंदवावेत/अद्ययावत करावेत आणि प्रत्यक्ष स्वरूपात शेअर्स धारण करणाऱ्या सभासदांनी खाली दिलेल्या तपशिलाप्रमाणे कंपनीच्या आरटीएशी साधून त्यांचे ईमेल आयडी, बँक तपशील आणि केवायसी नोंदवावेत/अद्ययावत करावेत. प्रत्यक्ष स्वरूपात शेअर्स धारण करणाऱ्या सभासदांना त्यांचे शेअर्स डिमटेरिअलाईज करून घेण्याचा सल्ला देण्यात येतो.

भागधारकांनी कृपया पर्सन्स ॲक्टींग इन कॉन्सर्ट (पीएसी) च्या भागधारणासह कंपनीतील त्यांची भागधारणा त्वरित कळवावी. सेबी (सबस्टॅशीअल ॲक्विझीशन ऑफ शेअर्स अँड टेकओव्हर्स) रेग्युलेशन्स २०११ च्या रेग्युलेशन २ (क्यू) अंतर्गत 'पीएसी' ची व्याख्या दिलेली आहे. पुढे, सिक्युरिटीज कॉंट्रॅक्टस (रेग्युलेशन्स) (स्टॉक एक्सचेंजेस अँड क्लिअरिंग कॉर्पोरेशन) रेग्युलेशन्स, २०१८ च्या रेग्युलेशन १९ आणि २० नुसार फक्त योग्य आणि सक्षम व्यक्तींकडून कंपनीच्या शेअर्सचे व्यवहार केले जातील.

संदर्भीत विषयी कोणत्याही चौकशीसाठी, भागधारकांनी कृपया कंपनीचे आरटीए केफिन टेक्नॉलॉजीज लिमिटेड, युनिट : मल्टी कमोडिटी एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेड, सेलेनियम टॉवर बी, प्लॉट क्र. ३१-३२, फायनान्शिअल डिस्ट्रीक्ट, नानकरामगुडा, सेरिलिंगमपल्ली मंडल हैद्राबाद, रंगारेड्डी, तेलंगणा, भारत - ५०००३२ येथे संपर्क साधावा. टोल फ्री क्र. : १८००-३०९-४००१, ई-मेल आयडी : einward.ris@kfintech.com.

मल्टी कमोडिटी एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेड साठी
सही/-
मनिषा ठाकुर
कंपनी सेक्रेटरी
सभासदत्व क्र.: ए१०८५५
ठिकाण : मुंबई
दिनांक : २४ जुलै, २०२६

जना स्मॉल फायनान्स बँक (एक शेड्युल्ड कमर्शिअल बँक)

नोंदणीकृत कार्यालय :- द फेअरवे, तळ आणि पहिला मजला, सर्व्हे क्र. १०/१, ११/२ आणि १२/२बी, डोमलूर लगत, कोरमंगला इनर रिंग रोड, ईजीएल बिझनेस पार्कच्या पुढे, चल्लाघट्टा, बंगळुरु-५६००७१.

खाजगी करारामार्फत विक्रीची सूचना

सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेटस अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (सरफैसी ॲक्ट) अन्वये बँकेकडे प्रभारीत स्थावर मत्तेची विक्री.

जना स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड चे प्राधिकृत अधिकारी या नात्याने निम्नस्वाक्षरीकारांनी सरफैसी ॲक्ट अंतर्गत परिशिष्ट मिळकतीचा **प्रत्यक्ष कब्जा** घेतला.
जना स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड च्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी मिळकतीची विक्री करण्याकरिता आधीच अनेक जाहीर लिलाव आयोजित केले होते. परंतु, कोणत्याही बोली प्राप्त न झाल्याने ते अवशस्वी ठरले. म्हणून कृपया कळविण्यात की, सदर सूचनेच्या सदर प्रकाशनाच्या तारखेपासून **पंधरा (१५)** दिवसांत उपरोक्त कर्ज खात्यातील एकूण उर्वरित थकबाकीचे प्रदान न झाल्यास, प्राधिकृत अधिकारी खाली नमूद केलेल्या मिळकतीच्या खाजगी करारद्वारे विक्रीची कार्यवाही करतील.
तमाम जनतेला कळविण्यात येते की, परिशिष्टात वर्णन केलेली तारण मिळकत, बँकेच्या थकबाकीची वसुली करण्याकरिता बँकेला मान्य होतील अशा शर्तीवर खाजगी करारा मार्फत विक्रीसाठी उपलब्ध आहे.

खाजगी कराराने मिळकतीच्या विक्रीसाठी प्रमाण अटी व शर्ती खालीलप्रमाणे:

१. खाजगी कराराने होणारी विक्री ''**जे आहे जेथे आहे तत्त्वाने**'' आणि ''**जे आहे जसे आहे तत्त्वाने**'' होईल.
२. खरेदीदाराला या सूचनेच्या प्रसिध्दीच्या समाप्तीवर विक्री मोबदल्याचा १००% रक्कम जमा करणे आवश्यक आहे.
३. जर बँकेद्वारे खरेदीचा प्रस्ताव अस्विकार केल्यास, अर्जासह भरलेली रक्कम, काही असल्यास, विहित मुदतीत व्याजाशिवाय परत केला जाईल.
४. खरेदीदार त्याच्या समाधानासाठी (खाजगी करार मार्फत विक्री अंतर्गत) मिळकत संबंधित सर्व पैलूवर रितसर तपास करणे आवश्यक आहे. खरेदीदार या संबंधित त्यानंतर प्राधिकृत अधिकारी/तारण धनको विरोधात कोणताही दावा करण्यास हक्कदार नसेल.
५. कोणतेही कारण न देता खरेदीचा कोणताही प्रस्ताव फेटाळण्याचे अधिकार बँकेने राखून ठेवले आहेत.
६. खरेदीदारांनी मिळकतीच्या खरेदीच्या संबंधातील सर्व मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क, आणि अन्य खर्च, कर, आकारणी, सोसायटी देयके भरावी लागतील.
७. विक्री सरफैसी ॲक्ट/नियमांच्या तरतुदींनुसार केली जाईल.

अ. क्र.	कर्ज खाते क्रमांक	कर्जदार/सह-कर्जदार यांचे नाव	सरफैसी ॲक्ट अंतर्गत १३(२) मागणी सूचनेप्रमाणे रक्कम	खाजगी करासाठी राखीव किंमत
१	३३९७९६३०००४२१, ३३९७९६३०००१३९० व ३३९७९४१०००३९०	१) प्रमोद जयंत टोनापेकर, २) वैशाली प्रमोद टोनापेकर	२०.१०.२०२५ रोजीस रु. १५,६७,२७६.१ (रुपये पंधरा लाख सदुसष्ट हजार दोनशे शहात्तर आणि एक पैसा मात्र)	रु. ७,००,०००/- (रुपये सात लाख मात्र)
	तारण मत्तांचे वर्णन :- सर्व्हे क्र. २८२, प्लॉट क्र. ६०, सिटी सर्व्हे क्र. १३०९, साई प्रसाद अपार्टमेंट, तळमजला, फ्लॅट क्र. १, क्षेत्रफळ ७५० चौ. फूट म्हणजेच ६९.७० चौ. मीटर, बांधकाम पूर्वेकडील अर्धा भाग म्हणजेच क्षेत्रफळ ३७५ चौ. फूट म्हणजेच ३४.८५ चौ. मीटर, बांधकाम, मौजे चिंचवड, ता. हवेली, जि. पुणे-४११०३३ येथे स्थित धारक स्थावर मिळकतीचे ते सर्व भाग आणि विभाग. **सीमाबद्ध : पूर्वेस :** : मोकळी जागा, **पश्चिमेस :** दुकान, **दक्षिणेस :** प्लॉट क्र. १ चा भाग, **उत्तरेस :** पार्किंगची जागा.		

तारण मत्तांच्या विक्रीपूर्वी बँकेने उपार्जित केलेल्या सर्व खर्च, आकार आणि परिव्यय यासह एकत्रितपणे उपरोक्त थकबाकी रक्कम प्रदान करून येथे वर वर्णन केलेल्या तारण मत्तांच्या विमोचनासाठी सरफैसी ॲक्टच्या कलम १३(८) च्या तरतुदींकडे वरील कर्जदार/सह-कर्जदारांचे लक्ष वेधण्यात येत आहे.
पत्रव्यवहाराचा पत्ता: श्री. दिलशाद कोकणे (मोबा. क्र. ९९८७५००७११), श्री. रंजन नाईक (६३६२९५१६५३), श्री. कौशिक बी (मोबा. क्र. ७०१९९४९०४०). जना स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड, (याआधी मे. जनलक्ष्मी फायनान्शिअल सर्व्हिसेस प्रा. लि. नावे ज्ञात), ज्यांचे कार्यालय येथे जना स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड, मोदी प्लाझा, कार्यालय क्र. ७०४/७०५, मुकुंद नगर, स्वारगेट, लक्ष्मीनारायण सिनेमा हॉलच्या समोर, पुणे - ४११०३७.

दिनांक: २४.०७.२०२६, ठिकाण: पुणे
सही/- प्राधिकृत अधिकारी, जना स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड करिता

Bank of Maharashtra

Zen Life — Making Life Simpler — Bank of Maharashtra
YEAR OF DEPOSITS FY 2026-27

मुंबई नॉर्थ झोनल कार्यालय:- यशोमंगल बिल्डिंग, प्लॉट क्र. ६३२, गांधीनगर, बांद्रा पूर्व, मुंबई - ४०००५१ **ई-मेल:** Dzmmsz@Bankofmaharashtra.Bank.In
मुख्य कार्यालय: लोकमंगल, १५०१, शिवाजीनगर, पुणे-५

स्थावर मिळकतींच्या विक्रीसाठी विक्री सूचना (जोडपत्र-IV-ए)

एएक्स६५/ईलिलाव विक्री सूचना/२०२६-२७ — **दिनांक: २४.०७.२०२६**

सिक्युरिटायझेनश ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिल ॲसेट ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ सहवाजता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ८(६) अंतर्गत स्थावर मत्तेचा विक्री करिता ई-लिलाव विक्री सूचना.

अ. क्र.	खात्याचे नाव आणि मालमत्तेचे मालक	शाखा	संतुलन	मिळकतीचे तपशील/कब्जाचा प्रकार	राखीव किंमत (लाखात)
१	**जनरल इलेक्ट्रिक मालक: श्री. मनोहर गणपत गायकर**	बोरिवली पश्चिम	रु. १६,६७,४३०/-	फ्लॅट क्र.५, तळ मजला, ए विंग, जय गोविंद नगर सीएचएसएल, हनुमान नगर, गोडदेव पार्क, फाटक रोड, भाईंद्रर पूर्व, ठाणे-४०११०५., बिल्ट अप क्षेत्र - २७० चौ.फू. **कब्जाचा प्रकार: सांकेतिक**	१२.८९
२	**संतोष एकनाथ भोईर साक्षी संतोष भोईर**	चारकोप	रु. १८,११,८२१.७६/-	फ्लॅट क्र.२०२, दुसरा मजला, बी विंग, साई एन्क्लेव्ह, वसई नायगाव लिंक रोड, नायगाव पूर्व, पालघर - ४०१२०८ चटई क्षेत्र ३७७ चौ.फू. बिल्ट अप क्षेत्र ४५२.५२ चौ.फू. **कब्जाचा प्रकार: सांकेतिक**	२९.६०
३	**सुभाष चंद्र गुप्ता पूनम गुप्ता**	चेंबूर	रु. १७,०१,५२४.९२/-	फ्लॅट क्र.२०२, २रा मजला, श्री सिद्धीविनायक हाइट्स, सर्व्हे क्र. १२०, हिस्सा क्र. ७-३/बी, टिटवाळा, तालुका कल्याण, जिल्हा ठाणे ४२१६०५ बिल्ट अप क्षेत्र ५२६.०३ चौ.फू. **कब्जाचा प्रकार: सांकेतिक**	१५.०१
४	**श्री. प्रदीप महादेव देठे**	अंधेरी सीप्झ	रु. १०,०१,९४२/-	फ्लॅट क्र.८, २रा मजला, इंद्रप्रस्थ २, बिल्डिंग क्र. डी, सर्व्हे क्र. ३४६/२/ए + ३६४/१/ए, प्लॉट क्र. ए आणि बी, जामदार रोड, कसबा तालुका बारामती, पुणे ४१३१०२ बिल्ट अप क्षेत्र - ५८८.७४ चौ.फू. **कब्जाचा प्रकार: सांकेतिक**	१०.८७
५	**निलेश अशोक मुंज हमीदार- स्मिता निलेश मुंज**	पंतनगर, घाटकोपर	रु. ११,२५,८१५.९८/-	फ्लॅट क्र.३०४, ३रा मजला, बिल्डिंग क्र.१६, ए विंग, सेक्टर १, अर्जुन कर्म रेसिडेन्सी, उप जिल्हा शहापूर, जिल्हा ठाणे ४२१६०१., बिल्ड अप क्षेत्र - २७३.८७ चौ.फू., **चटई क्षेत्र - २४८.९८ चौ.फू. १बीएचके. कब्जाचा प्रकार: सांकेतिक**	८.६४
६	**अल्पेशकुमार परशोत्तमभाई परमार हमीदार- पुरूषोत्तम पंजाभाई परमार**	ठाकूर गाव	रु. १२,२८,१७९/-	फ्लॅट क्र.४०४, ४था मजला, बिल्डिंग क्र.१, ए विंग, परमात्मा नगर सीएचएसएल, वसई पूर्व, जिल्हा पालघर - ४२१२०८ चटई **क्षेत्र-३२९ चौ.फू. बिल्ड अप क्षेत्र - ३५९ चौ.फू. १ आरके., कब्जाचा प्रकार: सांकेतिक**	१४.४४
७	**वंदना किशोर शिर्के सह-कर्जदार किशोर एस शिर्के**	अंधेरी सीप्झ	रु. १९,२९,४२५/-	फ्लॅट क्र.००१, बी विंग, तळ मजला, अधव रेसिडेन्सी, आटगाव, शहापूर, ठाणे-४२१६०१., चटई क्षेत्र - ३१५ चौ.फू. १ बीएचके., **कब्जाचा प्रकार: सांकेतिक**	१३.३३
८	**शम्मी हक**	सांताक्रुझ पश्चिम	रु. ३०,५९,२९०/-	फ्लॅट क्र.१०२, १ला मजला, लक्ष्मी कीर्ती सीएचएस लि., न्यू सर्व्हे क्र.९७, हिस्सा क्र. १० सी, गाव खारी, गणेश इंडस्ट्रीयल इस्टेट बीपी क्रॉस रोड क्र.४ मागे, खारी गाव, भाईंद्रर पूर्व, ठाणे ४०११०५., **बिल्ट अप क्षेत्र - ५४० चौ.फू. १ बीएचके., कब्जाचा प्रकार: प्रत्यक्ष**	३१.१७
९	**अनिता सतीश मिश्रा**	चारकोप	रु. १८,२९,७४६/-	फ्लॅट क्र.४०१, ४था मजला, डी विंग, बिल्डिंग क्र.३, ट्युलिप बिल्डिंग मधील यशवंत संकल्प, जी.आर.इंजिनिअरिंग जवळ, सारावली, बोईसर पश्चिम, पालघर ४०१५०१., **चटई क्षेत्र - ३२७.०१ चौ.फू. बिल्ट अप क्षेत्र - ३९२ चौ.फू. १ बीएचके., कब्जाचा प्रकार: प्रत्यक्ष**	१७.५
१०	**दीपाली अशोक पवार हमीदार: अशोक नारायण पवार**	जोगेश्वरी पश्चिम	रु. २७,०९,३६७/-	फ्लॅट क्र.२०३, ओम साई कृपा अशा ज्ञात बिल्डिंग मधील २रा मजला वर असलेले आणि येथे स्थित सर्व्हे क्र. ७-ए, हिस्सा क्र. १/१ (पी) येथे गाव बेलावली, तालुका अंबरनाथ, जिल्हा ठाणे, महाराष्ट्र-४२१५०३. **कब्जाचा प्रकार: प्रत्यक्ष**	१८.६३
११	**सोहेल कुरेशी गुलजार सोहेल कुरेशी**	अंधेरी पश्चिम	रु. २६,१८,०३९/-	समतुल्य गहाण चे फ्लॅट क्र.५०२, ५वा मजला, सी विंग, शिव शाही कॉम्प्लेक्स, अहमदनगर कल्याण रोड, गाव नारायणगाव, ता. मुरबाड, जिल्हा ठाणे-४२१४०१. **कब्जाचा प्रकार: सांकेतिक**	१७.०१
१२	**श्री. अशोक नारायण पवार हमीदार: सौ. दीपाली अशोक पवार**	जोगेश्वरी पश्चिम	रु. २७,०९,३६७/-	फ्लॅट क्र.२०४, ओम साई कृपा अशा ज्ञात बिल्डिंग मधील २रा मजला वर असलेले आणि येथे स्थित सर्व्हे क्र. ७-ए, हिस्सा क्र. १/१ (पी) येथे गाव बेलावली, तालुका अंबरनाथ, जिल्हा ठाणे, महाराष्ट्र-४२१५०३. **कब्जाचा प्रकार: प्रत्यक्षफ**	२०.३
१३	**१. सौ. प्रीती रवी मल्होत्रा, रवी कुमार यांची पत्नी (अर्जदार) २. श्री. रवी कुमार मल्होत्रा, यदू नाथ सिंग यांचा मुलगा (सह-अर्जदार)**	वर्सोवा	रु. २१,५७,९९१/-	समतुल्य